# प्रेस नोट दि. २३/०९/२०२१

## घरफोडी करणाऱ्या टोळीतील दोन सख्या भावांना गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवड कडुन अटक

## घरफाडीचे एकुण-४८ गुन्हे उघड व १८,३०,००/- रु. कि. चा मुद्देमाल जप्त.

मागील काही दिवसांमध्ये पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातिल हद्दित येणाऱ्या ग्रामीण भागात रात्रीचे वेळी बंद घरांचे कुलुप तोडुन व दुकानाचे शटर उचकटुन घरफोडया होण्याचे बरेच प्रकार घडले होते. **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश सो,** यांनी सदर प्रकाराची गंभीर दखल घेवुन गुन्हे शाखेस सदर प्रकारात लक्ष घालुन आरोपी अटक करुन गुन्हे उघडकीस आणुन प्रतिबंध करणे बाबत आदेशित केले होते.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर तसेच गुन्हे शाखा युनिट-४ कडील अंमलदार सदर घटनांच्या अनुशंगाने तपास करत होते.

तेव्हा **सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख** आणि **पोलीस अंमलदार प्रशांत सैद** यांनी मागील ८-९ महिन्यातील आयुक्तालयाचे हद्दितील ग्रामिण भागातिल घरफोडीचे गुन्हे घडलेल्या प्रत्येक घटनास्थळास भेट देवुन त्या ठिकाणी साक्षिदारांकडे तपास करुन, सी.सी.टी.व्ही फुटेज गोळा करुन तसेच घटनास्थळांचे तांत्रिक विश्लेषन करुन महत्वाचे पुरावे गोळा केले. त्यावरुन सदरचे गुन्हे ०६ सदस्य असलेल्या एकाच टोळीने केल्याचे व सदरचे आरोपी हे पुणे ग्रामीण हद्दितील कामशेत व पौंड भागातिल असल्याचे निष्पन्न केले.

त्यानुसार सदर प्रकरणाचा छडा लावणे करिता आम्ही हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३२/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७ या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड यांचेकडे वर्ग केला. त्यानंतर **सहा.पो.उप.निरीक्षक जाधव, पोहवा/शेटे, पोना/नदाफ, पोना/जायभाये, पोना/गुट्टे, पोशि/सैद** या पथकाने केलेल्या तांत्रिक विश्लेषणाचे आधारे सदर टोळीचे मुख्य सदस्य असलेल्या आरोपी नामे **१) साहील रमेश नानावत ऊर्फ अल्लु अर्जुन वय-२५ वर्षे, रा- मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे** व **२) देवदास ऊर्फ दास रमेश नानावत, वय-२३ वर्षे, रा-मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे** या दोन सख्या भावांना ते भांडगाव, ता-दौंड ,जि-पुणे येथे ते त्यांचे एका नातेवाईका कडे लपुन बसलेले असतांना दि. १३/०९/२०२१ रोजी ताब्यात घेवुन त्यांना सदर गुन्ह्यात अटक केली. त्यानंतर सदर आरोपींकडे कसोशिने तपास केला असता त्यांनी त्यांचे इतर साथिदार पाहिजे आरोपी नामे १) सुरदेव नानावत रा. घोटावडे ता. मुळशी जि. पुणे २) ध्यान केसरिया राजपुत रा. नांदे ता. मुळशी जि. पुणे ३) अजय सरजा नानावत रा. पौड जि. पुणे ४) राम बिरावत रा. पौड जि. पुणे, यांचे सह मागिल ०३ वर्षात रात्रीचे वेळी बंद घरांचे कुलुप तोडुन व दुकानाचे शटर उचकटुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत **२९** व पुणे ग्रामिण चे हद्दित **१९** असे एकुण **४८ घरफोडीचे गुन्हे** केल्याचे व पुणे ग्रामिण ची गुन्हे शाखा सुद्धा बरेच दिवसांपासुन सदर आरोपींच्या मागावर असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींनी सदर गुन्हयातील चोरी केलेले काही सोन्याचे दागिने सोनार नामे **योगेश नुर सिंह, वय- ३४ वर्षे, रा- नाकोडा ज्वेलर्स, एस.टी. स्टॅड जवळ, ता-पौंड, जि-पुणे** यास विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सुद्धा अटक करण्यात आली आहे.इतर पाहिजे आरोपींचा शोध सुरु आहे.

**सदर आरोपींकडुन २२० ग्रॅम सोन्याचे दागिने, ०२ मोटारसायकल, गॅस सिलेंडर, होमथिएटर, बॅटऱ्या, कुलर, मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण १८,३०,०००/- रु कि. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

### उघड गुन्हे

| अ.क्र | पोलीस ठाणे | एकुण ४८ गुन्हे उघड |
|---|---|---|
| १ | हिंजवडी पोलीस ठाणे | १३ गुन्हे |
| २ | सांगवी पोलीस ठाणे | ०३ गुन्हे |
| ३ | वाकड पोलीस ठाणे | ०१ गुन्हे |
| ४ | तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे | १२ गुन्हे |
| ५ | पौंड पोलीस ठाणे (पुणे ग्रामिण) | ०७ गुन्हे |
| ६ | वडगाव मावळ पोलीस ठाणे (पुणे ग्रामिण) | ०६ गुन्हे |
| ७ | कामशेत पोलीस ठाणे (पुणे ग्रामिण) | ०३ गुन्हे |
| ८ | घोडेगाव पोलीस ठाणे (पुणे ग्रामिण) | ०३ गुन्हे |

## -: गुन्हा करण्याची पद्धत :-

यातील अटक व पाहिजे आरोपी यांचा पौड व मावळ परिसरात जंगलात डोंगर पायथ्याशी अवैध गावठी हातभट्टीची दारु तयार करुन विकण्याचा धंदा आहे. सदरचे आरोपी ज्या भागात चोरी करायची आहे त्या भागात दिवसा फिरुन कुलुप बंद घरे हेरुन ठेवत असे व रात्रीचे वेळी सदर घरांचे कटावनी व कटरचे सहयाने कुलुप तोडुन सोन्या चांदीचे दागिणे व रोख रक्कमेची चोरी करत तसेच बंद दुकानाचे शटर उचकटुन रोख रक्कम व किराणा मालाची चोरी करत असे. सदर आरोपी हे चोरीतुन मिळालेल्या पैशातुन महागडे कपडे घेणे, स्पोटर्स बाईक वापरणे अशा हौसा पुर्ण करत होते

---------------------------------------------------------------ooo--------------------------------------------------------------

**यातील अटक व पाहिजे आरोपींविरुद्ध यापुर्वी खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.**

१) साहील रमेश नानावत रा- मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे दारुबंदीचे ०४ गुन्हे
२) देवदास रमेश नानावत, रा-मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे दारुबंदीचे ०३ गुन्हे
३) सुरदेव नानावत रा. घोटावडे ता. मुळशी जि. पुणे घरफोडी- ५३ व खुन- ०१ गुन्हे
४) ध्यान केसरिया राजपुत रा. नांदे ता. मुळशी जि. पुणे घरफोडी- ०४ गुन्हे
५) अजय सरजा नानावत रा. पौड जि. पुणे घरफोडी- ०७ गुन्हे
६) राम बिरावत रा. पौड जि. पुणे, घरफोडी- ०७ गुन्हे

---------------------------------------------------------------ooo--------------------------------------------------------------

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२, आनंद भोईटे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक, सिद्धनाथ बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, संतोष असवले, पोना/मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, आदिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे, तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, विकास आवटे, पोपट हुलगे यांनी केली आहे.

**(सुधीर हिरेमठ)** भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड

# गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन उघडकिस आणलेले ४८ गुन्हे

**अटक आरोपी:-** १) साहिल रमेश नानावत रा- मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे,
२) देवदास ऊर्फ दास रमेश नानावत रा- मु. पाथरगाव, पो. कामशेत ता. मावळ जि. पुणे

**पाहिजे आरोपी:-**
१) सुरदेव नानावत रा. घोटावडे ता. मुळशी जि. पुणे
२) वासुदेव रमेश नानावत रा. भांडगाव ता. दौड जि. पुणे,
३) ध्यान केसरिया राजपुत रा. नांदे ता. मुळशी जि. पुणे
४) अजय सरजा नानावत रा. पौड

---

❖ **पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दितील उघडकिस आणलेले गुन्हे:-**

१) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३२/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७ (तपासा वरील गुन्हा)
२) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३४१/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
३) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-७७८/२०१८ भा.दं.वि.कलम-३८०,४५४,४५७
४) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१८९/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
५) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६२२/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
६) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३८५/२०१८ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७,५११
७) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६३२/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
८) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१९०/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
९) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४६१/२०२१ भा.दं.वि.कलम- ३७९
१०) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३६/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
११) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४७/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
१२) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६४८/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
१३) हिंजवडी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६६४/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७, ५११
१४) सांगवी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१६५/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४,४५७
१५) सांगवी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४४/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५७
१६) सांगवी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१३८/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५७
१७) वाकड पोलीस ठाणे, गु.र.नंबर-५३०/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४,४५७
१८) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२३६/२०१८ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५७
१९) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३४१/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५७
२०) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३७५/२०१८ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५७
२१) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४१०/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७, ५११
२२) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४६५/२०१८ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५७
२३) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-८४३/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
२४) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४८३/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७,५११
२५) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६७२/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
२६) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६९/२०१८ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
२७) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६५७/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
२८) तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, गु.र.नंबर-६२५/२०२० भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
२९) तळेगाव पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२८६/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७,५११

❖ **पुणे ग्रामीण हद्दितील उघडकिस आणलेले गुन्हेः-**

१) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-२४१/२०१९ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
२) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-४७/२०१८ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
३) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-४५/२०२० भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
४) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-४१४/२०१९ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
५) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-१४१/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
६) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-१९६/२०२१ भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७
७) पौंड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गु.र.नंबर-५२०/२०२० भा.दं.वि.कलम-३८०,४५४, ४५७,५११
८) घोडेगाव पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१९२/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
९) घोडेगाव पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१९३/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
१०) घोडेगाव पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१९७/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०, ४५४, ४५७
११) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२७४/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१२) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२१३/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१३) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१२५/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१४) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-१६६/२०२१ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१५) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२२/२०१८ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१६) वडगाव-मावळ पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३९५/२०२० भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१७) कामशेत पोलीस ठाणे, गु.र.नंबर-२०/२०२० भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१८) कामशेत पोलीस ठाणे, गु.र.नंबर-११०/२०१९ भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७
१९) कामशेत पोलीस ठाणे, गु.र.नंबर-४२९/२०२० भा.दं.वि.कलम- ३८०,४५४,४५७